advt11

# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

**आय्‌एस्‌ओ ९००१ : २००८ मानांकित संस्था**

**१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.**

## कृषी विद्यापीठातील आचार्य पदवी प्रवेश

(सविस्तर माहितीसाठी **www.mcaer.org** किंवा **http://oasis.mkcl.org/agriphd** पहा)

महाराष्ट्र राज्यातील महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला, मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी व डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली या चारही कृषी विद्यापीठांतर्गत सन २०११-१२ या शैक्षणिक वर्षाकरिता आचार्य पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेमार्फत केंद्रीय पध्दतीने राबविण्यात येत आहे.

**उपलब्ध विद्याशाखा**

| | |
|---|---|
| (१) पीएच.डी. (कृषी) | (२) पीएच.डी. (गृहविज्ञान) |
| (३) पीएच.डी. (मत्स्यशास्त्र) | (४) पीएच.डी. (कृषी जैव तंत्रज्ञान) |
| (५) पीएच.डी. (कृषी अभियांत्रिकी) | |

सन २०११-१२ या शैक्षणिक वर्षाची प्रवेश प्रक्रिया महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित, पुणे (मज्ञाम) यांचेद्वारा ऑनलाईन पध्दतीने पूर्ण करण्यात येत आहे. यासाठी प्रवेश माहिती पुस्तिका कृषी परिषद व 'मज्ञाम' च्या अनुक्रमे **www.mcaer.org किंवा http://oasis.mkcl.org/agriphd** या संकेतस्थळांवर **दि.५ ऑक्टोबर,२०११ पासून उपलब्ध करून देण्यात येत आहे.**

**प्रवेश अर्ज दाखल करण्यासाठी अवलंबवावयाची कार्यपध्दती-**

उमेदवारांनी 'मज्ञाम' च्या संकेतस्थळाद्वारे संगणकावर प्रवेश अर्ज भरावा आणि प्रवेश अर्जाची download केलेली प्रत, आवश्यक ती सर्व कागदपत्रे तसेच प्रवेश अर्जाच्या शुल्काचा धनाकर्ष यासह 'महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित, आय स्पेस, पहिला मजला, बी विंग, १ अे, स.क्र. ५१, बावधन खुर्द, महिंद्र फर्स्ट चॉईस शोरूमच्या जवळ, पुणे-४११ ०२१' येथे पाठवावा. **धनाकर्ष 'MKCL, PUNE' या नावाने पुणे येथे देय असावा.**

**आचार्य पदवी अभ्यासक्रमासाठी मुद्रित प्रवेश अर्ज दाखल करण्याचा अंतिम दिनांक २४/१०/२०११ आहे.**

**प्रवेश अर्ज दाखल करण्यासाठी प्रवेश अर्जासोबत भरावयाचे शुल्क-**

खुल्या प्रवर्गासाठी रु. ६००/-

आरक्षित प्रवर्गासाठी रु. ३००/- (अ.जा., अ.ज., वि.जा*, भ.ज*, इ.मा.व*, वि.मा.व*.)

[*उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र अनिवार्य.]

टपालाच्या विलंबामुळे प्रवेश अर्ज उशिरा प्राप्त झाल्यास कृषी विद्यापीठ, कृषी परिषद अथवा 'मज्ञाम' जबाबदार राहणार नाहीत. अंतिम तारखेनंतर प्राप्त झालेले अर्ज रद्दबातल ठरविण्यात येतील.

प्रवेश पात्रता, प्रवेश क्षमता, आरक्षण इत्यादी सविस्तर तपशिलाचा अंतर्भाव असलेली माहिती पुस्तिका उक्त संकेतस्थळांवर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

क्र. मकृप/शिक्षण-१/६१११/२०६४ स्वाक्षरीत/-

दिनांक- २९ सप्टेंबर,२०११ **महासंचालक**

महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे